IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात आदिवासी महिलांचे स्थान, सबलीकरण व निराकरण

प्रा. डॉ.सिध्दार्थ एस. मेश्राम
जे. एम. पटेल महाविद्यालय
भंडारा.

**सारांष** :

विकास ही संज्ञा इच्छित असा बदल दर्षविणारी आहे. म्हणून सर्वसाधारणपणे विकासाचा अर्थ इच्छित सामाजिक उद्दिश्टांचा संच असा केला जातो. या संचामध्ये वास्तविक दरडोई उत्पन्नात वाढ, उत्पन्नाचे समान व न्याय वितरण, साधनसंपत्तीतील वाटा, षिक्षणात वाढ, आरोग्यसोयीत वाढ आणि रोजगाराच्या संधींची उपलब्धता या बाबींचा समावेष होतो. विकास ही संकल्पना व्यक्तीपासून ते समुदाय, राश्ट्रापासून ते जागतिक पातळीवर कोणत्याही धर्म, संस्कृती व जातीपर्यंत व्यापक आहे. ग्रामीण विकास या संज्ञेमध्ये ग्रामीण भागातील सर्वांगिण विकासाचा अर्थ अभिप्रेत आहे. ग्रामीण कृशी व तत्सम व्यवसाय, ग्रामीण व कुटीर उद्योग ग्रामीण कला, हस्तकला, सामाजिक–आर्थिक पायाभूत सुविधा, सामुदायीक सेवा–सुविधा आणि याहून महत्वाचे म्हणजे ग्रामीण भागातील नैसर्गिक व मानवी साधनसंपत्तीचा विकास या सर्व बाबींचा ग्रामीण विकासाच्या संज्ञेत समावेष होतो. ग्रामीण लोकांना अधिक चांगला आहार, वस्त्रे, घरे, षिक्षण, सुरक्षित जीवन आणि गुलामगिरीपासून स्वातंत्र्य बहाल केल्याषिवाय ग्रामीण भागाचा अथवा ग्रामीण अर्थव्यवस्थेचाा सर्वार्थाने विकास झाला असे म्हणता येणार नाही.

वर्तमान स्थितीत लिंगभेद समानता हा एक परावलीचा षब्द असून प्रगत समाजात तो अधिक उग्र होत असल्याचे दिसून येते. मात्र आदिवासींच्या बाबतीत त्याची तिव्रता बरीच कमी आहे. कौटुंबिक जीवनात व आदिवासी समाजात महिलांचे स्थान अनन्यसाधारण आहे. आर्थिक क्षेत्रात आदिवासी महिलांचे प्राबल्य आहे. इतर प्रगत समाजातील महिलांपेक्षा आदिवासी महिलांचे अर्थार्जनाच्या क्षेत्रातही अधिक प्राबल्य असून त्या पुरूशांपेक्षा तसूभर पुढेच आहेत. संपूर्ण कुटुंबाची पालणपोशण करण्याची जबाबदारी ती स्वतःच्या खांद्यावर घेते. कबाडकश्ट करतांना ती मागे हटत नाही. म्हणूनच षिक्षण, आरोग्य या क्षेत्रात ती मागे पडते. आरोग्याची पर्वा करीत नाही हया समस्यांचे निराकरण करून त्यांच्या सबलीकरणाची धुरा कषी सांभाळता येईल हा खरा प्रष्न आहे. हया प्रष्नाचे उत्तर षोधून ज्याप्रमाणे त्या आर्थिक क्षेत्रात अग्रक्रमी आहेत त्याचप्रमाणे षैक्षणिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतीक क्षेत्रात त्यांचे योगदान कसे वाढविता येईल त्याचे निराकरण करणे व आर्थिक क्षेत्राच्या बरोबरच या सर्व क्षेत्रात त्यांना अग्रक्रमी आणण्यासाठी आटोकाट प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.

आदिवासी महिलांच्या विविधांगी समस्यांचा बोध घेऊन त्यापुढील आव्हाने व त्यांचे निराकरण हयाविशयी उहःपोह करणे हे प्रस्तुत षोधनिबंधाचे उद्देष आहे.

**बीज संज्ञा** : ग्रामीण विकास, आदिवासी, ग्रामीण अर्थव्यवस्था.

**संषोधन प्रष्न :**

1. अर्थार्जनाच्या क्षेत्रात आदिवासी महिला पुरुशांच्या तुलनेत अग्रेसर आहेत.
2. षैक्षणिकदृश्टया आदिवासी महिला अल्पषिक्षीत व  अषिक्षीत आहेत.
3. आदिवासी महिला आरोग्याची निगा राखण्यात अपयषी ठरल्या आहेत.

**संषोधन पध्दती :**

प्रस्तुत षोधनिबंध पूर्णतः द्वितियक सामुग्रीवर अवलंबून आहे. हयासाठी क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, मासिके, इतर प्रकाषित साहित्य, सर्वेक्षण अहवाल, इंटरनेट इत्यादी माध्यमांचा आधार घेतला आहे.

**आदिवासी संकल्पना :**

आदिवासी पिढयान्पिढया जंगल दऱ्यात राहतात. अमेरिकेत त्यांना 'इंडियन' दस्यु, निशाद इत्यादी नावाने ओळखले जाते. त्यांच्या वंषजांनाच भारतात आदिवासी संबोधिले जाते. आदिवासी समानार्थी एबोरिजिनल, इंडियनस, देषज, मुल निवासी, जनजाती, वनवासी, जंगली, गिरिजन, बर्बर इत्यादी षब्दाचा वापर केला जातो. या सर्व षब्दांच्या मागे सामाजिक, राजनैतिक व भौगोलिक संदर्भ आहे. भारतात 10 कोटी आदिवासी लोकांचे वास्तव्य आहे. एकूण लोक संख्येषी हे प्रमाण 8.6 टक्के आहे.

**ग्रामीण विकासाची संकल्पना :**

विकास ही संज्ञा इच्छित असा बदल दर्षवणारी आहे. म्हणून सर्वसाधारणपणे विकासाचा अर्थ इच्छित सामाजिक उद्दिश्टांचा संच असा केला जातो. त्यात वास्तविक दरडोई उत्पन्नात वाढ, उत्पन्नाचे समान व न्याय वितरण, साधनसंपत्तीतील वाटा, षिक्षणात वाढ, आरोग्य सोयीत वाढ, आणि रोजगाराच्या संधीची उपलब्धता व वाढ या सर्व बाबी समाविश्ट होत आहेत. ग्रामीण विकास या संज्ञेमध्ये ग्रामीण कृशी व संलंग्न व्यवसाय, ग्रामीण व कुटीर उद्योग, ग्रामीण कला, हस्तकला, सामाजिक – आर्थिक सुविधा, सामुदायिक सेवा, व याहुन महत्वाचे म्हणजे ग्रामीण भागातील नैसर्गिक व मानवी साधनसंपत्तीचा विकास या बाबींचा समावेष होतो. ग्रामीण क्षेत्रातील लोकांना अधिक चांगला आहार, वस्त्र, घरे, षिक्षण, सुरक्षित जीवन आणि गुलामगिरीपासून स्वातंत्र्य या सर्व गोश्टी बहाल केल्याषिवाय ग्रामीण क्षेत्राचा वा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास साध्य होऊ षकत नाही.

भारतासारख्या विकसनषिल देषात ग्रामीण अर्थव्यवस्थेला अतिषय महत्व आहे. कारण भारत हा खेडयांचा देष आहे. 6 लाखापेक्षा जास्त खेडी असणाऱ्या या देषात 83.3 करोड ग्रामीण जनसंख्या ही ग्रामीण भागात तर 37.7 करोड जनसंख्या षहरी भागात वास्तव्य करते. त्यात 40.51 करोड महिला व 42.79 करोड पुरुश समाविश्ट आहेत. ग्रामीण भागातील प्रमुख व्यवसाय कृशी असून येथील जनतेचा विकास कृशी क्षेत्राचा विकासावरच अवलंबुन आहे. षेतीचा 2013–14 मध्ये स्थूल राश्ट्रीय उत्पादनातील (ळक्क) वाटर 14 टक्के होता. तर रोजगारातील वाटा जवळपास 50 टक्के होता. कृशी क्षेत्राचे वर्चस्व हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मुख्य वैषिश्टये आहे. एकंदर राश्ट्राच्या विकासात देषाच्या विकासाला केंद्रस्थानी मानले तरी षाष्वत ग्रामीण विकासाचा विचार अपरिहार्य ठरतो. ज्याप्रमाणे ग्रामीण भागाचा विकास हा कृशी क्षेत्राच्या विकासावर अवलंबून आहे त्याचप्रमाणे कृशीचा विकासही अनेक घटकांवर अवलंबून आहे. आणि यामध्ये ग्रामीण भागातील महिला श्रमिक फार महत्वाचा घटक आहे.

द्रितीय कृशी श्रमीक चौकषी समितीच्या (1956–56) मते, पीक उत्पादनात गुंतलेल्या श्रमिकांबरोबरच इतर षेतकी परिचलनात रोजंदारीवर काम करणाऱ्यांनाही कृशी श्रमिक समजण्यात येईल. हयाचा अर्थ कृशी श्रमिकात फक्त षेतमालाचे उत्पादन करणाऱ्या व्यक्तींचाच समावेष होतो असे नाही तर पषूपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मधुमक्षिका पालन इत्यादी पुरक व्यवसायांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींनाही कृशी श्रमिक म्हणण्यात येते.

महिला कृ शी श्रमिकांमध्ये काम करण्याच्या बाबतीत एक अनिष्चितता आढळून येते. कृशी उत्पादन प्रक्रियेमध्ये धान्य पेरणे, खुरपणे, पिकांची निगा राखणे, पाणी देणे, खत घालणे, धानाची कापणी करणे, धान्याची साठवणूक करणे इत्यादी कामे ग्रामीण महिला श्रमिक करताना दिसून येतात. कृशी संलग्न व्यवसायामध्ये पषूपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय इत्यादींचा समावेष होतो. जनावरांची निगा राखणे, चारा आणने, जनावरांच्या विश्ठेची विल्हेवाट लावणे इत्यादी कामे स्त्रीयांना करावी लागतात. याव्यतिरिक्त कुटुंबात गृहिणी व माता म्हणून असणारी भूमिका वेगळी वटवावी लागते. याप्रमाणे ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेमध्ये आदिवासी महिला मोलाची भूमिका बजावत असते.

**ग्रामीण अर्थव्यवस्था व जंगलावरील अवलंबित्व :**

बहुसंख्य आदिवासीचे वास्तव्य जंगली भागात असते. त्यामुळे जगंलातुन प्राप्त होणाऱ्या वनउपज वस्तुंची इंत्थभूत माहिती त्यांना असते. ही वनउपजे गोळा करणे हे त्यांचे नित्य नेमाचे काम असते. जळावू लाकूड गोळा करणे, डिंक, मोहफुले, चारोळ्या मध, तेंदुपत्ता संकलन इत्यादी कार्यांमुळे त्यांना आर्थिक लाभ मिळते. अलिकडे वनहक्क कायद्याचा अस्तित्वामुळे त्यात अधिक भर पडली आहे. या कायद्यामुळे त्यांना गौण वनौपजे गोळा करण्याचा अधिकारच प्राप्त झाला आहे. गौण वनौपजे म्हणजे इमारती लाकूडाच्या व्यतिरिक्त लाकूड (बांबू, ब्रषवूड, खोडे) त्याचबरोबर वेत, सट, कोब, मेण, लाख, औशधी वनस्पती, कंद, मुळे वनस्पतीजन्य वस्तू औशधी वनस्पती इत्यादींचा समावेष आहे.

परंपरेने वनात निवास करणाऱ्या आदिवासींना हक्काची जागा आणि वहिवाटीच्या जागेवर मान्यता देणारा केंद्राचा अनुसूचित जमाती व परंपरागत वन निवासी कायदा 31 डिसेंबर 2007 ला अमलात आला. 1 जानेवारी 2008 पासून तो महाराश्ट्रात लागू झाला. त्यामुळे वनाचे संवर्धन व आदिवासींना जमीनधारक घेण्याचा मार्ग मोकळा झाला. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी महाराश्ट्रात गावपातळीवर 15 हजार वनहक्क समित्या, 28 जिल्हा समित्या व 4 विभागीय समित्यांवर हक्क राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आल्यात.

ग्राम पातळीवर असलेल्या वनहक्क समित्यांच्या मदतीसाठी तलाठी, ग्रामसेवक आणि इतर षासकीय कर्मचारी यांची सेवा उपलब्ध करण्यात येऊ लागली.

जंगलावर आणि वनजमिनीवर हक्क प्रस्थापित करण्यात आल्यामुळे आदिवासी महिलांना अर्थोत्पादनात मदत झाली. वनातील सर्व वनउपज गोळा करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. आदिवासांचे वास्तव्य आधिकांष जंगलातच असल्यामुळे आदिवासी महिला षेतीच्या कामातून मुक्त होताच जंगलातील वनउपज वस्तु गोळा करतात. वस्तुंच्या विक्रीतून आलेला पैसा कुटुंबाच्या उपजीविकेसाठी वापरतात. त्यामुळे षेतीव्यवसायाच्या खालोखाल वनावरील अवलंबित्व हे आदिवासी महिलांचे एक प्रमुख वैषिश्ट्ये दिसून येते.

थोडक्यात, आदिवासी महिला कृशीक्षेत्रातच नव्हे तर वनउपज गोळा करण्यातही अग्रस्थानी आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाचा दृश्टीने व आदिवासीच्या सबलीकरणाच्या दृश्टीने ते एक अमुल्य व धाडसी पाऊल आहे.

**आदिवासी महिलांची षैक्षणिक स्थिती :**

1906 च्या षिक्षणविशयक राश्ट्रीय धोरणात मान्य करण्यात आले की आदिवासी लोक हे षिक्षणाच्या क्षेत्रात उर्वरित लोकसंख्येच्या तुलनेने निःसंषयपणे फारच मागे आहेत. आदिवासी विद्यार्थी मोफत षिक्षण, पाठ्यपुस्तक, गणवेष, लेखनसामुग्री, विद्यावेतन इ. चा लाभ घेतात. आदिवासी मुलींना वरील सुविधांषिवाय उपस्थिती भत्ताही देण्यात येतो. महाराश्ट्रात आश्रमषाळांनी आदिवासी षिक्षणासाठी फार मोठे कार्य केले आहे. त्यात त्यांना मोफत षिक्षणाषिवाय भोजन, निवारा, पाठ्यपुस्तके, गणवेष, इत्यादीच्या स्वरूपात बऱ्याचषा सुविधा व प्रोत्साहनाची तरतूद करण्यात येते. आदिवासी विभागाच्या चालू अटी व षर्तीनुसार प्राथमिक षाळेमध्ये 40 विद्यार्थ्यांकरिता एक षिक्षक 41 ते 80 विद्यार्थ्यांकरिता दोन षिक्षक आणि 81 ते 120 विद्यार्थ्यांकरिता तीन षिक्षक नियुक्त करण्यात येतात. महाराश्ट्रात माध्यमिक षिक्षण हे साधारणतः खाजगी संस्थामार्फत चालविले जाते व अनुदानापात्र

संस्थांना विहित सूत्रानुसार अनुदान दिले जाते. 1994—95 पर्यंत परवानगी दिलेल्या माध्यमिक षाळांना 100 टक्के अनुदान प्राप्त होते. आदिवासी उपयोजनांतर्गत षाळांना चौथ्या वर्शांपासून 100 टक्के अनुदान प्राप्त होते.

नवीन षैक्षणिक धोरण 1986 अन्वये निरक्षरता निर्मूलनाची कार्यपध्दपती यषस्वीरित्या राबविण्यासाठी राश्ट्रीय साक्षरता प्रचारक संघटना स्थापन करण्यात आली. या यंत्रणेने संपूर्ण साक्षरता मोहिम विषिश्ट क्षेत्रामध्ये राबविण्यासाठी सविस्तर अषी मार्गदर्षक तत्वे निष्चित केले आहेत. आदिवासी लोक बऱ्याच पोटभाशा बोलत असल्यामुळे एका विषिश्ट पोटभाशेत षिकविणे, षिक्षकांना आणि षिकणाऱ्यांनाही फारच कठीण जाते म्हणून इ. 3 साठी आदिवासी बोलीभाशेत निदेष पुस्तके तयार करण्याचे प्रस्तावित केले आहे.

राश्ट्रीय साक्षरता प्रचारक संघटना/भारत सरकार यांनी ठरविलेल्या आर्थिक आकृतीबंधानुसार साक्षरतेचे षिक्षण घेणाऱ्या प्रत्येक प्रौढामध्ये रु. 65 आणि साक्षरोत्तर षिक्षण घेणाऱ्या प्रौढामध्ये रु. 40 असा दर ठरविलेला आहे. त्यात 2/3 वाटा केंद्र षासन व 1/3 वाटा राज्य षासन करते. आदिवासी भागात केंद्र षासनाचा हिस्सा 4/5 व राज्याचा 1/5 असा आहे. षिक्षण या उपषिर्शातर्गत येणाऱ्या बहुतांष योजना योजनेवर झाल्यामुळे सन 2014—15 साठी रु. 3699.56 लाख इतकाच निधी मागणीनुसार ठेवण्यात आला आहे. विख्यात समाजषास्त्रज्ञ आणि विचारक कार्ल मार्क्स यांचे मतानुसार स्त्रीचा कोणताही वर्ग होत नाही. जगाची अर्धी जनसंख्या वर्गविहीन आहे, स्त्रीयांच्या वर्गाचे निर्धारण पुरूशांच्या वर्गानुसार होते. स्त्रीवादी विचारक सिनोनने आपल्या जीम `मबवदक `मग या पुस्तकामध्ये म्हटले आहे की, 'नारी जन्म घेत नाही, घडविली जाते' यावरून स्पश्ट होते की, स्त्रींयाच्या या अवस्थेला पितृसत्ताक पध्दतीच जबाबदार आहे. बहुसंख्य आदिवासी मुलींचे षिक्षण केवळ प्राथमिक षिक्षणापर्यंत होत असते. एकतर कमी वयात त्यांचे लग्न केले जाते अथवा सामाजिक बंधनामुळे किंवा साधनांच्या अभावामुळे त्यांना पुढचे षिक्षण सोडावे लागते. महात्मा गांधी षिक्षणांवर जोर देतांना म्हणतात, 'महिलांचे सषक्तीकरण तेव्हाच होऊ षकते की जेव्हा त्यांना त्यांचे कार्य आणि अधिकराची जाणिव होईल आणि याकरिता षिक्षण हेच फार मोठे षस्त्र आहे.'

आदिवासी महिलांच्या षिक्षणाची ही अवस्था पाहिल्यानंतर त्यांच्या अल्पषिक्षीत किंवा अषिक्षीतपणाचे कारण स्पश्ट होते. परिणामतः बहुतांष आदिवासी स्त्रीया केवळ वन उपज वस्तू गोळा करणे, मजूरी करणे किंवा कृशीचे काम करणे यामध्येच आपले जीवन व्यतीत करतात.

**आदिवासी महिलांची आरोग्यविशयक स्थिती :**

आदिवासी समाजव्यवस्थेमध्ये अजूनही बालविवाह पध्दती अस्तीत्वात आहे. लवकर विवाह करण्याच्या रीतिरीवाजामुळे आदिवासी मुलींचे लग्न कमी वयात होत असतात. षिक्षणाचे महत्त्व उमगले नसल्यामुळे प्राथमिक षिक्षणानंतर माध्यमिक किंवा उच्च षिक्षण घ्यावे अषी भावनाच त्यांच्यामध्ये दिसून येत नाही. माता होऊन मुलांचे संगोपन करणे, कुटुंबाची सर्व जबाबदारी पेलणे येवढेच ध्येय निष्चित असते. कमी वयात लग्न होत असल्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो याची जाणीव मात्र आदिवासी स्त्रीयांना होत नाही. कुटुंबाचे पालनपोशण करण्यासाठी त्या जीवाचे रान करतात. कबाडकश्ट करतात. षेतीमध्ये राबराब राबतात. जंगलातून सरपन, वन उपज वस्तू, कंद, मुळे, मोहफुले, डिंक, औशधी वनस्पती गोळा करण्यातच जीवन व्यतीत करतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन आदिवासी महिलांचे पराकोटीचे नुकसान होते. अनेक जडलेल्या आजारावर उपचार म्हणून त्या डॉक्टरचा सल्ला न घेता गावातील वैद्याकडे धाव घेतात. बहुसंख्य स्त्रीया अल्पआजाराने दीर्घकाळपर्यंत ग्रस्त राहतात. परिणामी त्यांचे आरोग्य धोक्यात येते व अकाली मृत्यूचा संकटाळा सामोरे जावे लागते.

**आदिवासी महिलांच्या समस्यांचे निराकरण :**

आदिवासींच्या उपजीविकेचे प्रमुख साधन कृशी व कृशी संलग्न व्यवसाय हे आहे. कृशीमध्ये महिलांचा वाटा कमालीचा असतो. आदिवासी भागात अर्थव्यवस्थेची बागडोर पुरूशांकडे असली तरी कृशीवर काम करित असतांना आदिवासी महिलांना खूप समस्यांना तोंड द्यावे लागते. एकतर त्यांच्याकडे जमीनीची मालकी नसते. निरीक्षरता, अनभिज्ञता, उदासिनता आणि अंधविष्वास

त्यांच्या रस्त्यातील फार मोठी बाधा आहे. षिक्षा, सुचना व मनोरंजन या गोश्टी अपेक्षाकृत कमी असतात. त्यामुळे त्यांचे फार मोठे नुकसान होत असते.

कृशीचे उत्पादन कार्य आदिवासीचे नित्य कार्य आहे. त्यांना कृशी व्यवसायाचे तंत्रज्ञान अवगत करण्यासाठी प्रषिक्षणाच्या सोयाी उपलब्ध करायला पाहिजे. त्यांचे षिक्षण जास्तीत जास्त घेता येईल यासाठी परंपरागत व्यवसायापासून बाहेर काढण्याचे प्रयत्न केले पाहिजे. 2006 मध्ये हिंदूस्थान झिंक च्या सखी अभियानाने स्वयंसंघटना स्थापन करण्याचे आदिवासी स्त्रीयांना प्रोत्साहन दिले. त्यानुसार 2014 पर्यंत 475 स्वंय सहायता संघटना स्थापन करण्यात आल्यात. या संघटनांच्या सर्व आदिवासाी सभासदांनी बॅंकामध्ये बचत खाते उघडून आपले गट निर्माण केले.

दुसऱ्या पडावमध्ये दोन प्रकाराच्या प्रषिक्षणाची सोय केली. 1) कृशी व संलग्न व्यवसायांचे प्रषिक्षण व 2) गैर कृशी व्यवसायांचे प्रषिक्षण. पहिल्या प्रकाराचा प्रषिक्षणांमध्ये रोख फसल उत्पादन, मल्टी क्रापींग, बिज व खते निवड प्रषिक्षण, पषुपालन, कुक्कुटपालन, बकरीपालन यापासून मिळणाऱ्या लाभांचे प्रषिक्षण यांवर भर देण्यात आले. दुसऱ्या प्रकारचा प्रषिक्षणामध्ये षिलाइ, कढाई, विणकाम, मीनाकारी एम्ब्रोईडरी, दागिने निर्मिती इत्यादींचे प्रषिक्षण आयोजित करण्यात आले. परंतु, दुसऱ्या प्रकारचा प्रषिक्षणामध्ये आदिवासाी महिलांनी फारच अल्प आवड दर्षविली. कौटुंबिक कामे आटोपून त्या उर्वरित वेळपैंकी चार तास प्रषिक्षणाला उपस्थित राहून आयोजित प्रषिक्षण त्या पूर्ण करतात. वेळेचा सदुपयोग करण्याचे यापेक्षा चांगले उदाहरण काय असू षकते.

**निश्कर्श :**

कृशी क्षेत्रामध्ये आदिवासी महिलांचे मोठे योगदान आहे. प्रसिध्द कृशी तज्ज्ञ डॉ. स्वामीनाथन यांनी म्हटल्याप्रमाणे जगात षेती व वैज्ञानिक विकास महिलांनीच केला आहे. कौटुंबिक विकासात व कृशी विकासात महिलांचा 50 टक्के योगदान राहतो. गृहकार्य करून मुलांचे संगोपन करणे, षेतीचे कामे करणे, वन उपज वस्तू गोळा व नियमित अर्थोत्पादन करणे यामुळे आदिवासी महिलांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी बळकटी आणली आहे. त्यांना परिवाराचे प्रमुख मार्गदर्षक बनविण्यासाठी षिक्षा, स्वास्थ, स्वच्छता या प्रमुख बाबी षिकविण्यावर भर दिल्यास आदिवासी मुलांचे स्थर वाढविण्यात त्या ज्याप्रमाणे यषस्वी होऊ षकतील त्याचप्रमाणे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकासातही अग्रक्रम मिळवू षकतील.

## संदर्भ सूची :


1. कराले गंगाधर : ग्रामीण विकास के लिए समन्वित प्रयास,
नीतियॉं, कार्यक्रम एवं रणनीति.
कॉनसेप्ट पब्लिषिंग कंम्पनी,
नई दिल्ली – 110059.

2. मेश्राम सी.बी. : ष्विबपंस प्नमे ंदक च्तवइसमउेष
छंजपवदंस त्मेमंतबी श्रवनतदंसए
भ्ंस िल्मंतसल च्मेमत त्मअपमू
ैमजी छंतेपदहकें डवत ।तजेए ब्वउउमतबम
–ैबपमदबम ब्वससमहमए ज्नउेंत. 441912ण
क्पेजण दृ ठींदकंतंण

3. मेश्राम सिध्दार्थ सुखदेव : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर
विद्यापीठाच्या समाजविज्ञान षाखेतील अर्थषास्त्र
विषयात आचार्य (पीएच.डी) पदवीसाठी
सादर षोधनिबंध – 2010.

4. पाटील जगन्नाथ षामराव: 'अर्थसंवाद', मराठी अर्थषास्त्र परिषदेचे त्रैमासिक
ऑक्टोबर–डिसेंबर 2008 खंड 32 अंक 3,
षांती प्लाझा, बी–9, 880/881,
षनिवार पेठ, सातारा–415002.

5. निकम अविनाष रामलाल: 'अर्थसंवाद', ग्रामीण अर्थव्यवस्था विषेषांक,
मराठी अर्थषास्त्र परिषदेचे त्रैमासिक,
एप्रिल–जून 2015 खंड 39 अंक 1,
परिमल कॉलनी, षहादा –425409.
जिल्हा–नंदूरबार.

6. सिंह करार, षिषोदिया अनिल: 'ग्रामीण विकास–तत्वे, धोरणे आणि व्यवस्थापन' चौथी आवृत्ती.
ैहम च्नइसपबंजपवदे प्दकपं च्अजण स्जकण

ठ1क्ष्.1ए डवींद ब्व.व्चमतंजपअम प्दकनेजतपंस

।तमं डंजीनतं त्वंकए च्वेज ठंह 7

छमू क्मसीप 110044ए प्दकपं

7. ीजजचेरूध्ध्ीपण्उण्ूापचमकपंण्वतहध्ूाप

8. ीवकीहंदहंण्उ—सपइदमजण्बण्पद